# पालखी, कावड यात्रेत 'टिम स्पिरिट' जिंकले!




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक
सिटी न्यूज सुपरफास्ट
Web. https://epaper.citynewssuperfast.com
मुंबई
RNI No.- MHAR/ 26 /A4530 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | वर्ष १ | अंक ९६ | मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ | मूल्य ३ | पृष्ठे ८

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला** : अकोल्याची ऐतिहासिक श्रावणी कावड यात्रा आणि राजराजेश्वराची पालखी म्हणजे केवळ धार्मिक आणि श्रद्धेचा सोहळा नसून, ते नियोजन, शिस्त आणि 'टिम स्पिरिट'चे (सांघिक कार्य) एक अदभूत उदाहरण ठरले आहे. शनिवारी रात्रीपासून सुरू झालेला हा सोहळा सोमवारी रात्री आणि मंगळवारी पहाटेपर्यंत अत्यंत उत्साहात पार पडला. हजारो शिवभक्तांचा जनसागर रस्ते, गल्ली आणि मंदिरात उसळलेला असतानाही गेल्या ८२ वर्षात ना कुठे चेंगराचेंगरी झाली, ना कसला गोंधळ. अकोल्याच्या या भव्य व्यवस्थापन कौशल्याचे कौतुक सर्वच स्तरांतून होत आहे. यंदा सर्वांनी सांघिकपणे पावसाचे साकडे भगवंताला घातले. राजराजेश्वर मंदिर देखील आज सकाळी नित्यनियमाने स्वच्छ सुंदर होते.

सोमवारी सकाळी कावड व पालखीच्या मार्गावर हजारो भाविकांसाठी शेकडो भव्य मंडप उभे राहिले होते. शनिवारी रात्रीपर्यंत या मार्गावर कुठलेही अडथळे नव्हते, रविवारी रात्रीतून मंडप उभारले गेले. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे सोमवारी पालखी आणि कावड यात्रा पूर्ण होताच, कंत्राटदारांच्या टीमने तातडीने काम सुरू केले. मंगळवारी सकाळी शहरात एकही मंडप, फ्लेक्स किंवा बॅनर शिल्लक नव्हता. कंत्राटदार आणि कामगारांच्या या वेगवान सांघिक कामामुळे शहर अवघ्या काही तासांत पूर्ववत स्वच्छ झाले.



## खांद्याला खांदा लावून २० किमीची प्रवास

साधा अर्धा किलोमीटर जरी सोमवारी चालल्ले तर डोक्यावर तापणारे उन, चटका लावणारा सुर्य प्रकाश, अंगातून घामाच्या वाहणाऱ्या धारा प्रत्येकजण अनुभव होते. पण, गांधीग्रामच्या पूर्णा नदीवरून पवित्र जल आणण्यासाठी शेकडो तरुणांचे गट शनिवारी रात्रीपासूनच सज्ज झाले होते. खांद्यावर भरलेली कावड आणि दोन्ही बाजूंना शेकडो लिटर पाण्याचे वजन घेऊन तब्बल २० किलोमीटर येणे हा निव्वळ शारीरिक क्षमतेचा भाग नाही, तर ते उत्तम टिम स्पिरिटचे उदाहरण होते. प्रत्येक कावडधारी तरुण थकल्यावर दुसरा सहकारी क्षणाचाही विलंब न लावता कावड खांद्यावर घेतो. राजराजेश्वरावर शेकडो घागरींचे जल अर्पण करेपर्यंत ही साखळी एका शिस्तबद्ध लयीत सुरू असते. केवळ एका मंडळाने कावड / पालखी आणली नाही तर तब्बल दोनशे मंडळ सहभागी होते. हजारो वैयक्तिक कावडधारी हे खांद्यावर कावड आणून ग्रामदैवत भगवान राजेश्वरसमोर नतमस्तक झाले. मंदिर परिक्रमा करताना राजराजेश्वराची भरभक्कम पालखी उचलताना खांद्यावर पडणारा प्रचंड भार कसा सांभाळायचा, गर्दीत तोल कसा सावरत पुढे जायचे, याचे धडे कोणत्याही व्यवस्थापन संस्थेत दिले गेले नाहीत. हे ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आपोआप वळते झाले. विशेष म्हणजे, सोमवारी दिवसभर अहोरात्र कावड यात्रेत घाम गाळणारा तरुण आज मंगळवारी सकाळी नित्यनियमाने स्वतःच्या ड्युटीवर हजर होता, हा अकोलेकरांच्या टिम स्पिरिट व शिस्तबद्धतेचा सर्वोच्च नमुना मानला जात आहे.




## आरआरसी नेटवर्कचा १७ तासांचा लाईव्ह विक्रम

या संपूर्ण यात्रेचे जगभरातील भाविकांपर्यंत थेट प्रसारण करण्याचे कठीण काम 'आरआरसी नेटवर्क'ने करून दाखवले. आरआरसी समुहाने सलग १७ तास लाईव्ह प्रसारण केले. टीव्ही, युट्यूब, इंस्टाग्राम आणि फेसबुक या सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर हे प्रसारण अविरत सुरू होते.दोन दिवस केबल व इंटरनेट कनेक्शन जोडणे, १० जणांची कॅमेरा टीम, १० जणांची इंटरनेट टीम, तितकीच मोठी संपादकीय टीम आणि आरआरसी स्टुडिओमध्ये येणाऱ्या प्रत्येक पाहुण्याचा यथोचित सन्मान सांभाळत हे कार्य पार पडले. कोणत्याही तांत्रिक अडचणीशिवाय झालेले हे थेट प्रसारण केवळ टिम स्पिरिटमुळेच शक्य झाल्याचे आरआरसी समुहाचे कार्यकारी संपादक पंकज देशमुख यांनी सांगितले. 'अकोल्याच्या मातीत कावड व पालखी यात्रेतूनच आम्ही टिम स्पिरिट शिकलो. तेच प्रत्यक्ष आचरणात आणल्यामुळे जगभरातील लाखांवर दर्शकांनी अकोल्याचे हे थेट प्रसारण पाहिले.'

— **पंकज देशमुख**, कार्यकारी संपादक, आरआरसी समूह




## माझ्या टिमला 'सॅल्युट'

गांधीग्राम ते श्री राजराजेश्वर मंदिरादरम्यान निघणाऱ्या ऐतिहासिक कावड यात्रेसाठी अकोला पोलीस प्रशासनाकडून अत्यंत चोख आणि तंत्रज्ञानज्ञानाधारित बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक (एसपी) अर्चित चांडक यांनी आरआरसी न्यूज शी संवाद साधताना पोलीस दलाचे नियोजन आणि उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. कावड यात्रेदरम्यान सुरक्षेचा भाग म्हणून यंदा प्रथमच 'एक कावड मंडळ, एक दत्तक कॉन्स्टेबल' ही संकल्पना राबवण्यात आली. १५० कॉन्स्टेबल ने १५० मंडळ दत्तक देण्यात आले होते. मंडळ जिथून निघाला तिथे परत येई पर्यंत हे कॉन्स्टेबल दोन दिवस त्यांच्या सोबत होते. याशिवाय, गर्दीचे व्यवस्थापन सुरळीत ठेवण्यासाठी 'धक्का पार्टी' जी कावड मंडळाना समोर जाण्यासाठी प्रेरित करत होते. त्या शिवाय डिजिटल वॉच होता. १०० हून अधिक व्हिडिओग्राफर्स, ड्रोन कॅमेरे आणि कमांड कंट्रोल सेंटरमधील २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून थेट पोलिसांचे लक्ष होते. बंदोबस्ताचे नियंत्रण सेक्टर इन्चार्ज म्हणून पोलीस निरीक्षक (पीआय) पाहत होते त्यामुळे त्यांच्या सेक्टरमधून मंडळ बाहेर नेण्याची जबाबदारी त्यांची होती. गुन्हेगारीवर वचक बसवण्यासाठी राबवलेल्या 'वेडनसडे परेड' आणि एआय तंत्रज्ञानावर आधारित 'रो सिस्टीम' या उपक्रमामुळे जिल्ह्यातील गुन्ह्यांमध्ये ५८ टक्क्यांनी घट झाली आहे. या सर्वोत्कृष्ट आयटी प्रोजेक्टसाठी एनसीआरबी कडून अकोला पोलिसांचा गौरवही करण्यात आला आहे. असा तंत्रज्ञानाच्या आधार नियमित पोलिसींगच्या माध्यमातून यशस्वी बंदोबस्तात अकोला पोलिस दलाचा प्रत्येक कर्मचाऱ्याच्या टिम वर्क ला टिम स्पिरिटला सॅल्युट असल्याचे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक म्हणाले. तसेच, आपत्कालीन सेवेसाठी असलेल्या 'डायल ११२' च्या रिस्पॉन्स टाइममध्ये पहिल्या सहा महिन्यांत अकोला पोलीस राज्यात प्रथम क्रमांकावर राहिले आहेत. कावड भक्तांच्या शिस्तप्रियतेचे कौतुक करत एसपी अर्चित चांडक यांनी अकोला पोलीस जनतेच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असल्याचे स्पष्ट केले.

कावड यात्रेच्या काळात लाखोंच्या गर्दीचे नियंत्रण करणे हे मोठे आव्हान असते. जिल्हा पोलीस अधीक्षक (एसपी) अर्चित चांडक यांच्या नेतृत्वाखाली अकोला पोलीस दलाने हे आव्हान टिम स्पिरिटच्या जोरावर पेलले. दोन दिवसांचा हा बंदोबस्त शनिवारपासून ते सोमवारच्या मध्यरात्रीपर्यंत होता. गर्दीचे नियंत्रण करताना भाविकांना कुठलाही त्रास होणार नाही आणि वाहतूक कोंडी टळेल, या धोरणाने पोलिसांनी बजावलेली कर्तव्यनिष्ठा ही कौतुकास्पद ठरली. संपुर्ण देशात अशा प्रकारचा कावड उत्सव कुठे ही नाही त्यामुळे पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या नेतृत्वात अतिशय शिस्तबध्द कावड बंदोबस्ताचे कौतुक होत आहे.

# न्यामूर्ती बी.वी. नागरत्ना होणार भारताच्या पहिल्या महिला सरन्यायाधीश!

वृत्तसंस्था ८ सप्टेंबर

**दिल्ली** : भारतात सुप्रीम कोर्टात सरन्यायाधीश पद अद्याप कोणत्याही महिलेने भूषवलेले नाही. आता लवकरच भारताची ७५ वर्षांची प्रतीक्षा संपुष्टात येणार आहे. सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीश म्हणून बी.वी. नागरत्ना यांची नियुक्ती होण्याची शक्यता आहे. ज्येष्ठता क्रमानुसार विक्रम नाथ यांच्यानंतर आता



न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना यांची नियुक्ती होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. बी. व्ही. नागरत्ना यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९६२ रोजी बंगळुरूमध्ये झाला. त्यांनी के जीसस अँड मेरी कॉलेजमध्ये बीएचे शिक्षण पूर्ण केलं. पुढे १९८७ साली दिल्ली विद्यापीठातून एलएलबीचे शिक्षण पूर्ण केलं. त्यांनी १९८७ साली वकिली सुरू केली. न्यायमूर्ती नागरत्ना यांचे वडील ई.एस.व्यंकटरमैया हे सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश होऊन गेले आहेत. न्या. नागरत्ना यांनी सरन्यायाधीश पद भूषवल्यास, त्या अशा व्यक्ती ठरतील, ज्यांचे वडील आणि स्वत: दोघांनी सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश पद भूषवल्याचा इतिहास होईल.

# सरकारचे शिष्टमंडळ आता जरांगे पाटलांकडे जाणार नाही!

## १२ सप्टेंबरच्या अल्टिमेटमवर मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांची भूमिका

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

मुंबई : मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण पुन्हा तापले असताना मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी १२ सप्टेंबरपासून मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. मात्र, सरकारने आतापर्यंत आवश्यक ते निर्णय घेतले असून अनेक मागण्यांच्या अंमलबजावणीची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे आता जरांगे पाटील यांनी सरकारच्या भूमिकेला प्रतिसाद देत आंदोलन स्थगित करण्याचा विचार करावा, असे विखे पाटील यांनी म्हटले आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना विखे पाटील यांनी मराठा आरक्षणासंदर्भातील निर्णय, ५८ लाख नोंदींचा मुद्दा, कुणबी प्रमाणपत्रांसाठी सुरू असलेली प्रक्रिया आणि सरकारच्या पुढाकाराची माहिती दिली. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजासाठी यापूर्वीच्या सरकारांच्या तुलनेत मोठे निर्णय घेतल्याचा दावा त्यांनी केला.

मराठा आरक्षणाच्या मागण्यांसंदर्भात झालेल्या बैठकीत सध्याच्या परिस्थितीचा आणि घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आल्याचे राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले. मनोज जरांगे पाटील अद्याप आंदोलन मागे घेण्यास तयार नसल्याचे लक्षात आणून दिल्यावर विखे पाटील म्हणाले की, सरकारने मराठा समाजाच्या व्यापक हितासाठी आवश्यक ते निर्णय घेतले आहेत.या निर्णयांची अंमलबजावणीही सुरू आहे. जरांगे पाटील यांचे आणखी काही प्रश्न किंवा अपेक्षा असतील तर त्यावरही सरकारकडून तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, सरकारच्या निर्णयांनंतरही जरांगे पाटील समाधानी नसतील, तर त्यांचे समाधान करण्यासाठी सरकारकडे यापेक्षा वेगळा कोणता पर्याय उपलब्ध आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट संमिश्र २

मंगळवार, दि.८ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# गॅस एजन्सीचा हलगर्जीपणा; ग्राहक त्रस्त

प्रतिनिधी ८ सप्टेंबर



अकोट : शहरातील धमाल गॅस एजन्सीच्या कारभाराबाबत ग्राहकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, गॅस सिलेंडर वितरण व्यवस्थेवर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. काही ग्राहकांना लीक असल्याची तक्रार असलेले सिलेंडर मिळत असल्याची चर्चा असून, अशा परिस्थितीत सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनत आहे. गॅस सिलेंडरची होम डिलिव्हरी नियमित होत नसल्याने, अनेक नागरिकांना स्वतःची कसरत करत सिलेंडर रिफिलसाठी एजन्सीवर जावे लागत असल्याची ग्राहकांची तक्रार आहे. त्यातच काही ग्राहकांकडून डिलिव्हरीच्या वेळी निश्चित शुल्काव्यतिरिक्त अतिरिक्त पैसे मागितले जात असल्याची चर्चा असल्याने ग्राहकांमध्ये नाराजी आहे. विशेष म्हणजे, ग्राहकाने सिलेंडरचे वजन करून देण्याची मागणी केल्यास एजन्सीच्या कर्मचाऱ्यांना त्याचा त्रास होत असल्याचे चित्र काही वेळा दिसून येत असल्याचे ग्राहक सांगतात. ग्राहकाला मिळणाऱ्या सिलेंडरचे वजन, सील आणि सुरक्षितता याबाबत पारदर्शकता असणे आवश्यक असताना, त्यासाठी ग्राहकांनाच आग्रह धरावा लागत असेल तर ही बाब तपासण्याची गरज आहे. लीक सिलेंडरचे वितरण होत असेल तर त्याची जबाबदारी कोणाची? होम डिलिव्हरी नियमित का होत नाही? डिलिव्हरीसाठी अतिरिक्त पैसे मागितले जात असतील तर त्यावर नियंत्रण कोणाचे? आणि ग्राहकाने वजन तपासण्याची मागणी केल्यावर एजन्सीला अडचण नेमकी का? असे प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित होत आहेत. संबंधित गॅस एजन्सी तसेच गॅस कंपनीच्या अधिकाऱ्यांनी या तक्रारींची दखल घेऊन वितरण व्यवस्थेची तपासणी करावी, अशी मागणी ग्राहकांकडून होत आहे.

## सीताबाई महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

अकोला : सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये संस्थेचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंह मोहता, मानद सचिव डॉ. पवन माहेश्वरी यांच्या प्रेरणेने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर. डी. सिकची यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील इंग्रजी विभाग,अर्थशास्त्र विभाग व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विऽऽद्यमाने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. सर्वप्रथम संत गाडगेबाबा व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला हरार्पण व दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी मंचावर महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख व प्रभारी प्राचार्य प्रा.भास्कर धारणे,इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.भारती पटनायक, इंग्रजी विभागातील प्राध्यापक डॉ. ज्ञानशील खंडेराव व अर्थशास्त्र तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.प्रसन्नजीत गवई उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षण व शिक्षकांचे महत्त्व अधोरेखित करणारे लघुनाटिका सादर केली.

# सुकोडा गावामध्ये शेतकरी मेळाव्याचे आयोजन!

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

अकोला : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांच्या संकल्पनेतून सुरु असलेल्या तसेच संशोधन संचालक डॉ. एस.एस. माने यांच्या मार्गदर्शनात व कोरडवाहू संशोधन विभागाच्या नियोजनातून शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. पर्जन्यमानातील तूट व पावसातील खंडाच्या पार्श्वभूमीवर त्याचा खरीप हंगामावर होणारा परिणाम या विषयास अनुसरून सुकोडा येथे कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प आणि अ.भा.स.तन व्यवस्थापन विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि अकोला तर्फे शेतकरी मेळावा घेण्यात आला.

या कार्यक्रमास डॉ. अनिता चोरे, प्रमुख शास्त्रज्ञ कोरडवाहू शेती तथा विभाग प्रमुख कृषिविद्या यांनी अध्यक्षस्थान भूषवले. डॉ. राजेश पातोडे, वरीष्ठ शास्त्रज्ञ तथा विभाग प्रमुख, जल व मृद संधारण अभियांत्रिकी, डॉ. महिपाल गणवीर, वरीष्ठ शास्त्रज्ञ, कृषिविद्या डॉ. व्ही. व्ही. गौड, प्रकल्प अन्वेषक तथा वरीष्ठ शास्त्रज्ञ कृषीविद्या, सुकोडा येथील सरपंच, उप-सरपंच व गावकऱ्यांची प्रामुख्याने



उपस्थिती होती. डॉ. व्ही. व्ही. गौड यांनी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यांनी विविध पिकांमध्ये तन व्यवस्थापनाबद्दल शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यासोबतच पर्जन्यमानातील तूट बघता पिके तणविरहित ठेवन्यासाठीच्या उपाययोजना सांगितल्या तसेच पिडीकेव्ही द्रवरूप मायक्रो ग्रडेस, या सूक्ष्म अन्नद्रव्यांची, सखोल माहिती दिली. डॉ. राजेश पातोडे यांनी शेतकऱ्यांना पावसातील खंडाच्या काळात मृद व जल संधारण्याचे महत्त्व आणि सद्य स्थितीतील मातीतील ओलावा टिकवण्याबददल शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन केले. डॉ. अनिता चोरे, यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात पर्जन्यमानातील तुट व पावसातील खंडाच्या पार्श्वभूमीवर शेत आपत्कालीन नियोजनबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच सर्व शास्त्रज्ञांनी कार्यक्रमाच्या आधी काही शेतकऱ्यांच्या प्रात्यक्षिकाला भेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून पिडीकेव्ही निर्मित द्रवरूप मायक्रो ग्रडेस सूक्ष्म अनद्रव्ये शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आलेत. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन विशाल पांडागळे कनिष्ठ संशोधन सहायक यांनी केले. तर आभार प्रदर्शन पवन फुकट यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करण्याकरिता कु. वैष्णवी शर्मा, कनिष्ठ संशोधन सहायक, चंद्रमणी खंडारे कृषी सहायक व सुकोडा येथील गावकऱ्यानी परिश्रम घेतले.

# आदिवासी विद्यालयात शिक्षक दिन साजरा!

अकोट : सामाजिक संस्था रोटरी क्लब अकोट व्हिजन च्या वतीने आदिवासी विद्यालयात आदिवासी विद्यार्थ्यांच्या समोर शिक्षक दिन साजरा करण्यात आला यावेळी मंचावर रोटरी व्हिजनचे अध्यक्ष संदीप भुस्कट ,आनंद भोरे, नंदकिशोर शेगोकार, संजय बोरोडे, निर्वाचित अध्यक्ष अतुल मालानी सचिव अभिजीत अग्रवाल, किरण गुहे, मारू अल्केश शहा, उमेश पवार विद्यालयाचे मुख्याध्यापक पवार उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवर तथा सर्व शिक्षकांचे हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करण्यात आले. आदिवासी विद्यालयातील शिक्षक २४ तास कार्यरत असतो व त्यांचा सन्मान आजच्या दिवशी व्हावा हे औचित्य साधून हा शिक्षक दिन रोटरी व्हिजन च्या वतीने आदिवासी विद्यालय साजरा करण्यात आला. निवासी विद्यालय असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांची जबाबदारी हे शिक्षकांवर असते व सर्व शिक्षक हे आदिवासी मुलांचं शिक्षणा पासून जबाबदारी स्वीकारत कार्य करत असतात असे गौरव उद्गार प्रास्ताविकामध्ये नंदुभाऊ शेगोकार यांनी काढले.शुभेच्छा पर संदेश पवार, आनंद भोरे,उमेश पवार ह्या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात सोपान पवार मुख्य. सुनील भाजीपाले अधीक्षक, भारत गडलिंगे, दिलीप काटोले, नितीन कोरडे, अमोल पराड, सचिन गिरी, कु राजगुरे मॅडम, शितल टिकार,वैशाली बेंडे, माणिक पवार, सचिन बोंद्रे, निलेश गोतमारे, हरीश झाबरकर , अलका खुळे ह्या सर्व शिक्षक मंडळीचा रोटरी व्हिजन सदस्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

## अंजनगाव रोडवरील अपघातप्रवण ठिकाणी 15 दिवसांत गतिरोधक बसविण्याचे आश्वासन

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

अकोट : अकोट शहरातील अंजनगाव रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयासमोरील अपघातप्रवण ठिकाणी येत्या १५ दिवसांत गतिरोधक बसविण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागाने दिले आहे. विद्यार्थ्याच्या गंभीर अपघातानंतर नागरिकांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेमुळे प्रशासनाला अखेर दखल घ्यावी लागली. काही दिवसांपूर्वी विद्यालयासमोर एका विद्यार्थ्याचा अपघात होऊन तो गंभीर जखमी झाला होता. या परिसरात यापूर्वीही अनेक अपघात घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय प्रशासनाने वारंवार पत्रव्यवहार करून गतिरोधक बसविण्याची मागणी केली होती. मात्र, त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती. अपघातानंतर संतप्त नागरिकांनी संबंधित प्रशासनाला निवेदन देत रास्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला होता. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून परिस्थितीची गांभीर्याने दखल घेतली.

चर्चेनंतर विभागाने लेखी स्वरूपात आश्वासन देत येत्या १५ दिवसांत विद्यालयासमोरील रस्त्यावर गतिरोधक बसविण्याचे मान्य केले. त्यामुळे नागरिकांच्या दीर्घकालीन मागणीला अखेर यश मिळाले असून परिसरात समाधान व्यक्त होत आहे. यावेळी राजू ढोले, शिवा गोटे, रामेश्वर लिल्हारे, सहर्ष लाडोळे, गजानन प्रांजळे, सतीश प्रांजळे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

## पावसाचा खंड, दुष्काळी परिस्थितीच्या उंबरठ्यावर

मोहम्मद इम्रान ८ सप्टेंबर

आलेगाव : यावर्षी अल निनो मुळे पावसाच्या प्रमाणात मोठी तूट दिसून येत आहे,महाराष्ट्र राज्यात याचा परिणाम मागील महिनाभरापासून सर्वत्र दिसून येत असून त्यातही अकोला जिल्हा व पातूर तालुक्यात मागील पंधरा ते वीस दिवसापासून पाऊस नसल्याने शेतकरी चिंतातुर झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. यावर्षी मान्सून जरी देशात वेळेवर दाखल झाला असला तरी त्यावर अल निनोचा प्रभाव मोठ्या प्रमाणात झाला असल्याने राज्यात अनेक भागात अजून सुद्धा खरीप च्या पेरण्या झाल्या नसल्याचे भयावह चित्र



पहावयास मिळत आहे.अकोला जिल्ह्यात यावर्षी सुरुवातीला पावसाने चांगली साथ दिली मात्र मध्ये जुलै मध्ये दुसऱ्या आठवड्यात मोठा खंड पडला होता ,आता ऑगस्ट महिना सुरू झाला तेव्हापासून पातूर तालुक्यासह सम्पूर्ण जिल्ह्यात जवळपास पंधरा दिवस झाले पाऊस गायब असल्याचे चित्र आहे.

## अकोट-हिवरखेड मार्गावर मजुरांची ट्रॉली पलटी; एकाचा मृत्यू, पाच गंभीर जखमी

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

अकोट : बांबू कापण्यासाठी जात असलेल्या मजुरांच्या ट्रॅक्टर-ट्रॉलीला अकोट-हिवरखेड मार्गावरील उमरा फाट्यानजीक मंगळवारी सकाळी भीषण अपघात झाला. ट्रॉली पलटी झाल्याने झालेल्या या दुर्घटनेत २४ वर्षीय सुरेश बल्लू बावसकर यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर पाच मजूर गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर अकोट ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, जामनेर-भुसावळ परिसरातून मध्यप्रदेशातील बैतूल जिल्ह्यात बांबू कापणीच्या कामासाठी मजूर ट्रॅक्टर-ट्रॉलीने जात होते. अकोट-हिवरखेड मार्गावरील उमरा फाट्यानजीक आल्यानंतर ट्रॉली अचानक पलटी झाली. या अपघातामुळे ट्रॉलीतील मजुरांमध्ये एकच खळबळ उडाली. दुर्घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले.

या भीषण अपघातात सुरेश बल्लू बावसकर (वय २४) यांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य पाच मजूर गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने अकोट ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच वीर एकलव्य आपत्कालीन बचाव पथकाचे अध्यक्ष पांडुरंग तायडे यांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली. तसेच रुग्णवाहिकेच्या माध्यमातून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, मृतक सुरेश बावसकर यांचा मृतदेह अकोट ग्रामीण रुग्णालयात ठेवण्यात आला असून पोलिसांनी पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू केली आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी रस्त्यावरील खड्डे, उखडलेला मार्ग आणि सुरू असलेल्या रस्ते कामांमुळे वाहनावरील नियंत्रण सुटल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

# हिवरखेड येथे पोळ्यानिमित्त भरला बाजार

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

हिवरखेड : येथे भरणारा सोमवारचा आठवडी बाजार वर्षातून दोन वेळ स्थलांतरित होतो. प्रथम महाशिवरात्री निमित्ताने फेब्रुवारी किंवा मार्च दरम्यान देवळी वेश संत तुकाराम चौकात, तर दुसऱ्यावेळेस हा बाजार श्रावण मासाच्या शेवटी बैल पोळ्या निमित्त सदाशिव संस्थांन परिसरात भरतो,या दोन्ही बाजाराला यात्रेचे स्वरूप येते व मोठ्या प्रमाणात व्यापारी ग्राहकांची गर्दी जमते,

पोळ्या निमित्त सदाशिव संस्थांन नव्याने नमो उद्यान येथून तर नवीन बसस्थांक, दाता मियां दर्गाह, काळी पिळी बसस्थानक, भोपळे चौक, यासह हिवरखेड अकोट जळगांव या मार्गावर भरतो वाहतुकीचे सुद्धा या बाजारात नियम पाळल्या



जातात, या पोळ्याच्या बाजारात पिठोरी पट, बैलाचे शृंगार साहित्य, गणेश मूर्ती, मातीचे बैल, रंगी बेरंगी रेडीमेड हार यांसह खाद्य पदार्थ वेगवेगळ्या वस्तू अनेक छोट्या मोठ्या वस्तूची खरेदी विक्री करण्यासाठी ग्राहक व्यापारी गोळा होतात, व आवश्य वस्तू घेऊन ते बैल पोळ्यातील नंदी बैलाला सजावट करून पुजतात अशी ही परंपरा शेकडो वर्षांपासून सुरू आहे ,या परंमपरेचे गावकऱ्यांनच्या वतीने स्वागत केले जाते,

विशेष म्हणजे या पोळ्याच्या आठवडी बाजारात वरून राजाची हजेरी सुद्धा असते असे काही लोकं सांगतात तसेच आजच्या या आठवडी बाजारात वरून राजाने चांगलीच हजेरी लावली होती.

> पोळ्याचा आठवडी बाजार भरगच्च भरतो आणि बाजार स्थलांतर होण्याची जुनी परंपरा आहे. आम्ही लहान असताना आमच्या आजोबा, वडिलां सोबत आम्ही बाजार करायचो आज बाजारात येऊन येऊन मी व्यापारी झालो.
>
> **-नंदकिशोर रेखाते,** व्यापारी

> हा बाजार जुन्या परंमपरे नुसार स्थलांतर होतो. दुपारपर्यंत बाजरात चांगलीच गर्दी होती. दुपारी वरूण राजाने दमदार हजेरी लावली.
>
> **-पंकज ईल्लरकार नागरिक**

# श्रीमती रतनबाई ताराचंदजी कानूंगा विद्यालयात शिक्षक दिन संपन्न!

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

हिवरखेड : येथील श्रीमती रतनबाई ताराचंदजी कानुंगा विद्यालयामध्ये शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील स्वयं शासन कार्यक्रमांमध्ये असलेल्या विद्यार्थ्यांनीच शाळेचा कार्यभार उत्कृष्टरित्या सांभालळा व विद्यालयातील शिक्षकांचा सन्मान सुद्धा केला.यावेळी इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी बालसभेचे आयोजन केले होते.

सर्वप्रथम भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या फोटोचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले . व स्वयंशासन कार्यक्रमाच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील सर्व शिक्षकांचे पुष्प




गुच्छ देऊन स्वागत केले. संस्थेचे कार्यवाह श्यामशील भोपळे, संचालिका सौ. साधनाताई भोपळ यांचे विद्यार्थ्यांनी स्वागत केले. स्वयंशासन कार्यक्रम मध्ये मुख्याध्यापकांची भूमिका वर्ग सातवीचा विद्यार्थी नयन कट्यारमल यांनी स्वीकारली होती .व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी कु. भक्ती गिरी व कु ईश्वरी कट्यारमल यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन कु समीक्षा सोनोने हिने केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक रवींद्र सोळंके ,पर्यवेक्षिका सौ सीमा बांगर तसेच कु गोकुळा झापर्डे ,अंकुश हिवराळे सौ. आरती इंगळे , सौ सीमा धुमाळे , कु गायत्री इंगळे, आनंद राऊत ,विद्यालयाचे लिपिक योगेंद्र राऊत उपस्थित होते.

## कावड यात्रेत दोन मंडळातील सदस्यांमध्ये प्राणघातक हल्ला!

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

तेल्हारा : तेल्हारा शहरातील एकता कावड मंडळ आणि एक नंबरवासी कावड मंडळातील सदस्यांमध्ये रामनवमी जयंती उत्सवातील जुना वाद उफाळून आल्याने आडसूळ फाटा चौक येथे सोमवार, (७ सप्टेंबर) रोजी दोन गटांत हाणामारी झाली. या प्रकरणी परस्परविरोधी तक्रारींवरून दोन्ही गटांतील एकूण १७ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी (७ सप्टेंबर) रात्री सुमारे १ २ गटांतील एकूण १७जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वाजता एक नंबरवासी कावड मंडळ व एकता कावड मंडळाचे सदस्य अंदुरा येथील पूर्णा नदीतून पाणी आणण्यासाठी जात होते. काही सदस्य कातड घेऊन पुढे गेले, तर काही जण आडसूळ फाटा चौकात चहापाण्यासाठी थांबले होते. यावेळी दोन्ही गटांतील सदस्य समोरासमोर आल्यानंतर जुन्या वादातून वादावादी झाली.

फिर्यादी ऋतिक सचिन अवचार यांच्या तक्रारीनुसार, आरोपींनी जुन्या वादाचा उल्लेख करून धमकी देत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच चाकूने हल्ला करून जखमी केले.

## बंजारा समाजाचा तीज विसर्जन सोहळा उत्साहात!

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

पातूर : तालुक्यातील बोडखा तांड्यावर बंजारा समाजाचा पारंपरिक तीज उत्सव यंदाही मोठ्या उत्साहात, आनंदात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. रविवारी, दि. 6 सप्टेंबर रोजी सेवालाल महाराज मंदिर परिसरातून तीज विसर्जनाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. बंजारा गीतांच्या तालावर आणि डफडीच्या गजरात संपूर्ण तांडा भक्तिमय व उत्साहाच्या वातावरणाने दुमदुमून गेला. सेवालाल महाराज येथे पारंपरिक पद्धतीने तीज उत्सव साजरा केल्यानंतर मिरवणुकीला



सुरुवात झाली. बंजारा समाजाच्या पारंपरिक वेशभूषेत महिला व कुमारीका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. यावेळी बंजारा गीतांचे गायन करत महिलांनी आणि कुमारीकांनी तीज उत्सवाचा आनंद द्विगुणीत केला. मिरवणुकीदरम्यान डफडीच्या तालावर बंजारा समाजाचे नायक कारभारी यांनी ठेका धरत उत्साहात सहभाग नोंदविला. पारंपरिक गीत-संगीत, ढोल-डफडीचा गजर आणि समाजबांधवांच्या उत्स्फूर्त सहभाग यामुळे भेंडीमहाल तांड्यावर उत्सवाचे चैतन्य निर्माण झाले होते. मंदिर परिसरातून निघालेली ही मिरवणूक बोडखाच्या मुख्य मार्गाने मार्गक्रमण करत सुवर्णा नदीवर पोहोचली. तेथे धार्मिक विधी व पारंपरिक पद्धतीने तीजचे विसर्जन करण्यात आले. बंजारा समाजाच्या परंपरा, संस्कृती आणि सामाजिक एकोप्याचे दर्शन घडविणाऱ्या या तीज उत्सवात समाजबांधवांसह महिला व तरुणींची लक्षणीय उपस्थिती होती. पारंपरिक संस्कृतीचे जतन आणि नव्या पिढीपर्यंत बंजारा समाजाच्या रूढी-परंपरा पोहोचविण्याच्या दृष्टीने या उत्सवाला विशेष महत्त्व असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी बोडखा तांड्याचे नायक राजू राठोड, कारभारी बोदीराम चव्हाण, इत्यादींनी पुढाकार घेतला.

## पवन उंबरकार राज्यस्तरीय महाराष्ट्र गुणगौरव पुरस्काराने सन्मानीत!



प्रतिनिधी ८ सप्टेंबर

हिवरखेड : येथील पवन उंबरकार राज्यस्तरीय महाराष्ट्र गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिर्डी येथे बी, दि. चेंज फाऊंडेशन तर्फे पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात आला असुन यामध्ये अकोला जिल्हयातील हिवरखेड येथील हरहुन्नरी कलाकार पवन महाराज उंबरकार यांना महाराष्ट्र गुणगौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. पवन महाराजांच्या कर्तुत्वाचा, मेहनतीचा आणि कलेचा सन्मान म्हणजे हिवरखेड वासीयांसाठी अभिमानाची बाब आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com









राजेश्वरोत्सव







## ‘आरआरसीच्या 25 वर्षांच्या वाटचालीचा अभिमान’- संजना गवळी



प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला :** कावड महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात शिवसेना विदर्भ संपर्क प्रमुख संजना ताई गवळी यांचे आरआरसीच्या मंचावर आगमन झाले. यावेळी त्यांनी आरआरसी न्यूज नेटवर्कच्या २५ वर्षांच्या वाटचालीबद्दल गौरवोद्गार काढत “आरआरसीच्या या प्रदीर्घ प्रवासाचा आम्हाला अभिमान वाटतो,” असे सांगितले.

गेल्या २५ वर्षांपासून आरआरसीने पत्रकारितेच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, या प्रवासात आरआरसीने सातत्याने जनतेचा आवाज मांडण्याचे काम केले असल्याचे त्यांनी नमूद केले. कावड महोत्सवाच्या निमित्ताने आरआरसीच्या मंचावर उपस्थित राहण्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला.

## ‘पालखी उत्सवाची परंपरा कायमस्वरुपी सुरु राहील- राजेश भारती



प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला :** कावड महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात पालखी समूहाचे अध्यक्ष राजेश भारती यांचे आरआरसीच्या मंचावर आगमन झाले. यावेळी त्यांनी पालखी उत्सवाच्या प्रदीर्घ परंपरेचा उल्लेख करत उत्सवाला यंदा ८४ वर्षे पूर्ण झाल्याचे अधोरेखित केले.राजेश भारती म्हणाले की, पालखी उत्सवाची ही परंपरा गेल्या ८४ वर्षांपासून अखंडपणे सुरू आहे. भाविकांच्या श्रद्धा आणि सहभागामुळे या उत्सवाला सातत्याने बळ मिळत आहे. आ. संतोष बांगर यांना आणण्यात राजेश भारती यांचा मोठा वाटा होता.

## अकोला पोलीस दलातर्फे आरआरसीला 25 वर्षांच्या वाटचालीस शुभेच्छा

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला :** कावड महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमादरम्यान खदान पोलीस स्टेशनचे ठाणेदार मनोज केदारे यांनी आरआरसीच्या मंचाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी आरआरसी न्यूज नेटवर्कच्या २५ वर्षांच्या वाटचालीबद्दल अकोला पोलीस दलाच्या वतीने शुभेच्छा दिल्या. मनोज केदारे यांनी



आरआरसीच्या मंचावरून उपस्थितांना संबोधित करताना आरआरसीने गेल्या २५ वर्षांत पत्रकारितेच्या क्षेत्रात केलेल्या कार्याचा उल्लेख केला. “आरआरसीच्या २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीबद्दल संपूर्ण अकोला पोलीस दलाच्या वतीने मनःपूर्वक शुभेच्छा,” असे त्यांनी यावेळी सांगितले.

## ‘आरआरसी’ सत्यच दाखवते- पवित्रकार



प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला :** कावड महोत्सवानिमित्त आयोजित कावड यात्रेला भेट देताना नगरसेवक आशिष पवित्रकार यांनी आरआरसीच्या मंचावरून उपस्थित जनतेला संबोधित केले. यावेळी त्यांनी ‘आरआरसी जे दाखवते, ते सत्य दाखवते’ असे म्हणत आरआरसी न्यूज नेटवर्कच्या कार्याचे कौतुक केले.

आरआरसी न्यूज नेटवर्कला नुकतीच २५ वर्षे पूर्ण झाली असून, ‘ज्याप्रमाणे आरआरसीने २५ वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण केला आहे, त्याचप्रमाणे लवकरच १०० वर्षे पूर्ण होतील, असा विश्वास आशिष पवित्रकार यांनी व्यक्त केला. कावड यात्रेच्या निमित्ताने आरआरसीच्या मंचावरून ते बोलत होते.

## आमच्या राजकारणाची सुरुवात आरआरसीमधूनच-साबळे

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**अकोला :** कावड महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे यांचे आरआरसीच्या मंचावर आगमन झाले.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाच्या सुरुवातीच्या आठवणींना उजाळा देत आरआरसी न्यूज नेटवर्कच्या कार्याचे कौतुक केले.

“आमच्या राजकारणाची सुरुवात येथूनच झाली. विद्यार्थी सेनेत असताना बंडूभाऊ देशमुख यांनी आरआरसीच्या माध्यमातून



आम्हाला व्यासपीठ उपलब्ध करून दिले,” असे पंकज साबळे यांनी सांगितले. “आम्हाला राजकारणात येऊन २५ वर्षे झाली आहेत आणि आरआरसीलाही २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. हा आमच्यासाठी खू प अभिमानाचा क्षण आहे.



गुजरात अंबुजा एक्सपोर्ट लि. अकोलाचे अध्यक्ष ब्रिजमोहन चितलांगे यांनी सोमवारी दुपारी आरआरसीला भेट दिली. मंचावर आरआरसीचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांनी त्यांचे स्वागत केले. चितलांगे यांनी आरआरसीच्या रौप्य महोत्सवी वाटचालीला शुभेच्छा दिल्या.





## चिमुकल्या बालगोपालांची नृत्यातून ‘शिवआराधना’!

### आरआरसी नेटवर्कने दिले व्यासपीठ उपलब्ध करून



अकोला : अकोला नगरीचा लोकोत्सव असलेल्या श्री राजराजेश्वर कावड व पालखी उत्सवानिमित्त आरआरसी नेटवर्कच्यावतीने कावड व पालखी मंडळाचे स्वागत करण्यासाठी भव्य स्टेज उभारला होता. यावेळी राजकारणातील दिग्गज व्यक्तिमत्वासह शहरातील गणमान्य नागरिक, कावडधारी यांनी विशेष उपस्थिती दर्शविली. या सर्वांचे मन:पूर्वक स्वागत आरआरसी नेटवर्कच्या वतीने करण्यात आले. यावेळी विशेष आकर्षण ठरले ते बालगोपालांची शिवआराधना नृत्य. अनेक चिमुकल्यांनी पारंपरिक वेशभूषेत येत उत्कृष्ट असा नृत्याविष्कार केला. त्यांच्या नृत्याच्या विविध भावमुद्रा टिपण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. अनेक शिवभक्तांनी हे नृत्य कॅमेराबद्ध केले. यावेळी या चिमुकल्या शिवभक्तांनाही आरआरसीने व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल सर्व स्तरातून



शुभेच्छांचा वर्षावर होत आहे.

विशेष म्हणजे या चिमुकल्यांचा हा नृत्याविष्कार कावड यात्रेत सहभागी सर्वांनी अनुभव असला तरी ‘आरआरसी लाइव्ह’च्या माध्यमातून शहरातील हजारो नागरिकांनी हा आनंद घरबसल्या लुटला. या शिवआराधना नृत्यात उन्नती शिरसाट, अनुजा जामनिक, स्वरा भातुलकर,आशय निशाराव आदी चिमुकल्या बालगोपालांनी सहभाग घेतला होता.

राजेश्वरोत्सव





## मान्यवरांच्या भेटी









# आष्टी विधानसभा मतदारसंघात आधुनिक फिश मार्केट उभारणार: नितेश राणे

राजेश जायस्वाल ८ सप्टेंबर

मुंबई: बीड जिल्ह्यातील आष्टी विधानसभा मतदारसंघातील नगरपंचायत आणि ग्रामपंचायत स्तरावर आधुनिक फिश मार्केट उभारण्याच्या प्रस्तावांना गती देऊन आवश्यक कार्यवाही कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावी, असे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत आष्टी विधानसभा मतदारसंघात नगरपंचायत व ग्रामपंचायत स्तरावर आधुनिक फिश मार्केट उभारण्यासाठी मंजुरी आणि निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात मंत्रालयात मंत्री नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.



या बैठकीस आमदार सुरेश धस यांच्यासह मत्स्यव्यवसाय विभागाचे अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे बीडचे जिल्हाधिकारी तसेच जिल्ह्यातील स्थानिक स्तरावरील संबंधित अधिकारी बैठकीत सहभागी झाले. आष्टी विधानसभा मतदारसंघातील तीन नगरपंचायत आणि सहा ग्रामपंचायतींसाठी फिश मार्केट उभारणीचे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आल्याची माहिती आमदार सुरेश धस यांनी बैठकीत दिली. या प्रस्तावांच्या आराखड्यांची तांत्रिक तपासणी तातडीने करण्यात यावी. आवश्यक त्या सर्व बाबींची छाननी करून फिश मार्केट उभारणीसंदर्भातील कार्यवाही कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावी, असे निर्देश मंत्री राणे यांनी दिले. फिश मार्केटची वास्तुरचना आधुनिक आणि अत्याधुनिक सुविधांनी युक्त असावी, यावर मंत्री राणे यांनी विशेष भर दिला. स्थानिक नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज बाजारपेठ उपलब्ध करून देताना दर्जेदार आणि दीर्घकालीन सुविधा निर्माण करण्यास प्राधान्य देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेचा जास्तीत जास्त लाभ स्थानिक नागरिकांना मिळेल, याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित बाजारपेठ मिळणार**

आष्टी विधानसभा मतदारसंघातील स्थानिक पातळीवर मत्स्य उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून द्यावे, असेही मंत्री राणे यांनी सांगितले. आधुनिक फिश मार्केटच्या माध्यमातून मत्स्य उत्पादकांना बाजारपेठ उपलब्ध होण्याबरोबरच ग्राहकांना स्वच्छ आणि नियोजनबद्ध पद्धतीने मत्स्य उत्पादने उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर मत्स्य व्यवसायाला चालना देण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाकडे पाहिले जात आहे. फिश मार्केट उभारताना केवळ इमारत उभारणी न करता नागरिकांसाठी स्वच्छता, सुरक्षितता, सुसज्जता आणि दीर्घकालीन उपयोगिता या बाबींवर भर देण्यात यावा, असे निर्देश मंत्री नितेश राणे यांनी दिले.

# 200 आमदारांचे सरकार तरीही महाराष्ट्र अडचणीत!

## शेतकरी आणि एमपीएससीच्या मुद्यांवरून सुप्रिया सुळेंची टीका

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)च्या खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकार परिषदेत राज्य सरकारच्या कारभारावर जोरदार टीका केली. एसटी महामंडळातील मनुष्यबळाचा प्रश्न, राज्यातील असमान पावसाची स्थिती, शेतकऱ्यांना हमीभाव न मिळणे, कर्जमाफी, ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न आणि एमपीएससी विद्यार्थ्यांचे आंदोलन अशा विविध मुद्यांवर त्यांनी सरकारला धारेवर धरले.

राज्यातील सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती गंभीर असून सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावून तातडीने आढावा घ्यावा, अशी मागणीही सुळे यांनी केली.

एसटी महामंडळाच्या बससेवेचा मुद्दा उपस्थित करताना सुप्रिया सुळे यांनी सरकारच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्यात एसटी महामंडळाकडे यापूर्वीच सुमारे ७०० बसेस आहेत. मात्र, त्या चालवण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने अनेक बस सेवेत वापरता येत नसल्याचा दावा त्यांनी केला. अशा परिस्थितीत राज्य सरकार आणखी २००० बस आणण्याच्या तयारीत आहे. आधीच्या ७०० बस आणि नव्याने येणाऱ्या २००० बस चालवण्यासाठी कर्मचारीच उपलब्ध नसतील, तर या बसचा उपयोग काय, असा सवाल सुळे यांनी उपस्थित केला. एसटीच्या सेवेत केवळ २०० ते ३०० कोटी रुपयांची गुंतवणूक करून आवश्यक मनुष्यबळ आणि सेवा व्यवस्था



सुधारली, तर सार्वजनिक वाहतुकीत मोठा बदल घडू शकतो, असेही त्यांनी म्हटले. मात्र, सरकारला सामान्य नागरिकांच्या मूलभूत सेवांकडे लक्ष देण्यासाठी वेळ नसल्याची टीका त्यांनी केली.

सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारच्या प्राधान्यक्रमावरही सवाल उपस्थित केला. कोल्हापूरमधील मागणी नसलेल्या रस्त्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च करण्याची सरकारची तयारी आहे, मात्र गाव-वाड्या-वस्त्यांमध्ये राहणाऱ्या सामान्य, शोषित आणि वंचित नागरिकांना आवश्यक सेवा देण्यासाठी निधी उपलब्ध नसल्याचे त्या म्हणाल्या. सरकारच्या कामांच्या मोठ्या जाहिराती दिसतात; मात्र प्रत्यक्षात नागरिकांच्या आयुष्यात किंवा सार्वजनिक सेवांमध्ये अपेक्षित सुधारणा दिसत नसल्याचे सुळे यांनी नमूद केले.

विद्यार्थी तसेच जन सामान्यांचे प्रश्न सोडविण्याबाबत शासकीय यंत्रणेत समन्वयाचा अभाव दिसतो असा आरोप देखील सुप्रीया सुळे यांनी केला.

# विशाखा राऊत यांना 6 वर्षांची निवडणूक बंदी; कोर्टाच्या निर्णयाने ठाकरे गटाचे टेन्शन वाढले

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

मुंबई: शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मुंबई महापालिकेत मोठा धक्का बसला आहे. पक्षाच्या नगरसेविका विशाखा राऊत यांचं नगरसेवक पद रद्द करण्यात आलं आहे. जात पडताळणी समितीकडून त्यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरवल्यानंतर हे प्रकरण चांगलंच तापलं होतं. विशाखा राऊत यांनी या निर्णयाविरोधात न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, तिथूनही त्यांना अपेक्षित दिलासा मिळाला नाही. अखेर मुंबई महापालिकेच्या सभेत त्यांचं पद रद्द झाल्याची घोषणा करण्यात आली. इतकंच नाही, तर विशाखा राऊत यांना पुढील सहा वर्षांसाठी निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे या कारवाईचा त्यांच्या राजकीय



कारकिर्दीवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

विशाखा राऊत या दादरमधील वॉर्ड क्रमांक 191मधून ओबीसी महिला राखीव जागेवर निवडून आल्या होत्या. या निवडणुकीत त्यांची लढत शिवसेना शिंदे गटाचे नेते सदा सरवणकर यांच्या कन्या प्रिया सरवणकर यांच्याशी झाली होती. ही निवडणूक अक्षरशः अटीतटीची ठरली. विशाखा राऊत यांना 13,326 मते, तर प्रिया सरवणकर यांना 13,039 मते मिळाली. म्हणजेच केवळ 197 मतांच्या फरकाने विशाखा राऊत यांनी विजय मिळवला होता. विशाखा राऊत यांनी ओबीसी आरक्षित जागेवर निवडणूक लढताना कुणबी जातीचं प्रमाणपत्र सादर केलं होतं. मात्र, प्रिया सरवणकर यांनी या प्रमाणपत्राच्या वैधतेसह क्षेत्राधिकारावरही आक्षेप घेतला होता. त्यानंतर प्रकरण जात पडताळणी समितीकडे गेलं. तपासणीनंतर समितीने विशाखा राऊत यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरवलं. त्यानंतर त्यांचं नगरसेवक पद धोक्यात आलं होतं. या निर्णयाविरोधात त्यांनी न्यायालयात दाद मागितली, पण तिथेही त्यांना दिलासा मिळाला नाही. यूबीटीचे विशाखा राऊत यांचं पद रद्द झाल्याने मुंबई महापालिकेतील शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या नगरसेवकांची संख्या 65 वरून 64 झाली आहे. दुसरीकडे, शिंदे गटाच्या संख्येत एका जागेची भर पडून ती 30 होणार आहे.

# राज्य सरकार ॲक्शन मोडवर!

## मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावर मध्यरात्री बैठक, कुणबी प्रमाणपत्राच्या मागणीवर चर्चा

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**मुंबई** : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालन्यातील अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची तीव्रता वाढत असतानाच राज्य सरकारही ॲक्शन मोडमध्ये आले आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज ११ वा दिवस असून सोमवारी मध्यरात्री त्यांची प्रकृती खालावल्याची माहिती समोर आली आहे. तर दुसरीकडे ओबीसी समाजाकडून देखील विविध आंदोलने केली जात आहेत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी



मध्यरात्री उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ, चंद्रशेखर बावनकुळे, उदय सामंत, राधाकृष्ण विखे पाटील, अतुल सावे, रविंद्र चव्हाण आणि आमदार प्रसाद लाड उपस्थित होते. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सरकारची पुढील भूमिका काय असावी, तसेच मनोज जरांगे यांच्या प्रमुख मागण्यांवर कोणता कायदेशीर आणि प्रशासकीय मार्ग काढता येईल, यावर बैठकीत सविस्तर चर्चा झाल्याची माहिती आहे. तसेच मराठा समाजाचा ओबीसी कोट्यात समावेश करण्याचा कोणताही निर्णय घेतल्यास ओबीसी आरक्षणाला धक्का बसू नये, यावर सरकारचा विशेष भर असल्याचे समजते. त्यामुळे एकीकडे मराठा समाजाच्या मागण्या आणि दुसरीकडे ओबीसी समाजाच्या आरक्षणाच्या मागण्या यांच्यात समतोल साधण्याचे मोठे आव्हान सरकारसमोर आहे.

**आरक्षणाचा निर्णय न्यायालयात टिकणारा असावा**

मराठा आरक्षणाचा प्रश्न यापूर्वीही न्यायालयीन पातळीवर चर्चेत राहिला आहे. त्यामुळे सरकारकडून कोणताही निर्णय घेताना तो संविधानिक आणि कायदेशीर चौकटीत राहावा, तसेच भविष्यात न्यायालयात टिकणारा असावा, यावर बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे. आरक्षणाच्या प्रश्नावर उपलब्ध असलेल्या विविध कायदेशीर पर्यायांचा विचार करण्यात आला.

# घणसोलीत दहीहंडी फोडताना 34 वर्षीय गोविंदाचा मृत्यू

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**नवी मुंबई:** गोविंदा उत्सवाच्या दहीकाला सोहळ्यादरम्यान घडलेल्या दुर्दैवी घटनेत घणसोली गाव कोळीवाडा गोविंदा पथकातील ३४ वर्षीय गोविंदा स्वप्नील नावर यांचे अकस्मात निधन झाले. या घटनेने घणसोली गाव, कोळीवाडा परिसर तसेच संपूर्ण गोविंदा पथकावर शोककळा पसरली आहे. दहीकाला उत्सवाच्या आनंदाच्या वातावरणात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे गोविंदा बांधवांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. स्वप्नील नावर यांच्या अकाली निधनाची बातमी समोर येताच कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार आणि गोविंदा पथकातील सहकाऱ्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला.



स्वप्नील नावर हे घणसोली गाव कोळीवाडा गोविंदा पथकाचा भाग होते. उत्सवाच्या काळात गोविंदा पथकांमध्ये उत्साह आणि आनंदाचे वातावरण असताना त्यांच्या निधनाच्या घटनेने या आनंदावर दुःखाचे सावट आले आहे. त्यांच्या अकाली निधनाने कुटुंबीयांसह मित्रपरिवार आणि सर्व गोविंदा बांधवांनी अत्यंत वेदनादायी दुःख व्यक्त केले आहे.

# बाप्पाच्या भक्तांसाठी खुशखबर मेट्रो-3 आता मध्यरात्रीपर्यंत सुरु

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**मुंबई:** गणेश भक्तांसाठी आनंदाची बातमी आहे. गणपती आणि गणेश मंडळाचे दर्शन घेण्यासाठी मध्यरात्रीपर्यंत बाहेर पडणाऱ्या मुंबईकरांची किंवा परतणाऱ्यांची चिंता काही प्रमाणात कमी होणार आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने गणेशोत्सव उत्सवादरम्यान १४ ते २५ सप्टेंबरपर्यंत मेट्रो-३ म्हणजेच ॲक्वा लाईनची सेवा मध्यरात्री १२ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या, कफ परेड आणि आरे जेव्हीएलआर किंवा दोन्ही टर्मिनल स्टेशन असलेल्या कांवड येथून शेवटची मेट्रो रात्री १०.३० वाजता सुटते. गणेशोत्सवाच्या काळात उत्सवाच्या शेवटच्या टप्प्यासाठी लागणारा वेळ वाढू लागला आहे. त्यामुळे, बाप्पाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना परतीच्या प्रवासासाठी मध्यरात्रीपर्यंत मेट्रोचा पर्याय उपलब्ध असेल. दादर, वरळी, महालक्ष्मी, गिरगाव आणि दक्षिण मुंबईतील प्रसिद्ध गणेश मंदिरांना भेट देण्यासाठी मोठ्या संख्येने भक्त येतात. दिवसभर काम करून दर्शनासाठी बाहेर पडणारे कर्मचारी, कुटुंबासोबत येणारे नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसोबत प्रवास करणाऱ्यांना या निर्णयाचा फायदा होईल.

# वरळीत भीषण अपघात! टॅक्सीतून उतरणाऱ्या वृद्ध महिलेला बेस्ट बसने चिरडले

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

मुंबई: मुंबईत गेल्या ६ महिन्यांत बेस्ट बस अपघातांच्या अनेक गंभीर घटना समोर आल्या आहेत. यामध्ये विशेषतः भाडेतत्त्वावरील कंत्राटी बसेसच्या चालकांच्या निष्काळजीपणामुळे अपघातांचे प्रमाण वाढल्याचे चित्र आहे. दरम्यान, आज (७ सप्टेंबर) पुन्हा एकदा बेस्ट अपघातामुळे वृद्ध महिलेचा मृत्यू झाला आहे. आज सकाळी वरळीतील एसटी ऑफिस सिग्नलजवळ झालेल्या एका दुर्दैवी अपघातात 60 वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला. मृत महिलेची ओळख वनमाला आर. साबळे अशी पटली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी ११.२५ च्या सुमारास मुंबई सेंट्रल डेपोची एक 'बेस्ट' बस भायखळा स्थानकाकडून लोटसच्या दिशेने जात होती. सिग्नल लाल असल्याने ही बस वरळी एसटी ऑफिस सिग्नलवर थांबली होती आणि बसच्या अगदी शेजारी एक टॅक्सी येऊन थांबली. वनमाला साबळे टॅक्सीतून बाहेर पडण्यासाठी दरवाजा उघडत असतानाच सिग्नल हिरवा झाला. यावेळी बस चालकाने निष्काळजीपणा करत, आजूबाजूची परिस्थिती न पाहता अचानक बस पुढे नेली, असा आरोप आहे. बस अचानक पुढे सरकल्याने वनमाला बसच्या चाकाच्या विळख्यात आल्या आणि बसचे मागील डाव्या बाजूचे चाक त्यांच्या डोक्यावरून गेले. अपघातानंतर लगेचच बस वाहकाने रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या वनमाला साबळे यांना नायर रुग्णालयात नेले, परंतु डॉक्टरांनी दुपारी १२ वाजता त्यांना मृत घोषित केले. दरम्यान, पोलिसांनी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे, तर परिवहन विभागानेही त्याच्यावर विभागीय कारवाई सुरू केली आहे.

# बीएमसीचा मोठा निर्णय; दिव्यांगांच्या मोफत बेस्ट प्रवासासाठी 7.64 कोटींचे अनुदान मंजूर

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

मुंबई: बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांसाठी फायद्याची बातमी आहे. आता त्यांचा बेस्ट बसचा प्रवास मोफत होणार आहे. दृष्टिहीन तसेच ४० टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींना 'बेस्ट' बसमधून विनामूल्य प्रवासासाठी महापालिकेकडून सात कोटी चौसष्ट लाख पंचावन्न हजार एकशे सत्तर रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. महापालिका आयुक्तांनी या खर्चाला मंजुरी दिली असून, अंतिम मान्यतेसाठी हा प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्यात आला आहे. दिव्यांगांच्या कल्याणासाठी महापालिकेकडून विविध उपक्रम राबविले जातात. याचाच भाग म्हणून बेस्ट प्रवासात दिव्यांगांना १०० टक्के सवलत देण्यात येते. त्यासाठीच महापालिकेने ७.६४ कोटींचे अनुदान दिले असून या अनुदानाच्या वितरणासाठी महापालिकेने काही अटी घातल्या आहेत. सवलतीचा प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी दिव्यांगांच्या प्रमाणपत्रांची काटेकोर पडताळणी करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे याची संपूर्ण जबाबदारी बेस्ट उपक्रमाची राहील. मुख्य लेखापरीक्षकांनी तपासलेली प्रत्येक तिमाहीची देयके सादर करावी लागणार आहेत. त्यासोबत ओळखपत्र नोंदी आणि तिकिटवाटप यंत्रातील अहवाल जोडणे देखील बंधनकारक असेल. महापालिका अधिनियमातील तरतुदींनुसार हे दायित्व स्वीकारून या रकमेचे वाटप संगणकीय प्रणालीद्वारे थेट केले जाणार आहे.

# लाखो रुपयांच्या आयफोन चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; चार आरोपी गजाआड

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

मुंबई: राज्यातील विविध जिल्ह्यांसह परराज्यांतून चोरी केलेले ॲपलचे आयफोन खरेदी करून त्यातील ॲपल आयडी काढून विक्री करणाऱ्या, तसेच आयडी काढता न आल्यास मोबाइलचे सुटे भाग करून विकणाऱ्या टोळीचा मरा मार्ग पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत चार आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून ६४ चोरीचे ॲपल मोबाइल आणि २० मोबाइलचे सुटे भाग असा एकूण ४४ लाख ७८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एमआरए मार्ग पोलीस ठाण्यात मे २०२६



मध्ये ॲपल मोबाइल चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे चोरीच्या मोबाइलमध्ये वापरण्यात आलेल्या सिमकार्डचा माग काढला. त्यातून एका संशयिताचा ठावठिकाणा मिळाल्यानंतर त्याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून २१ चोरीचे ॲपल मोबाइल आणि १२ सिमकार्ड जप्त करण्यात आले.

पोलिसांनी अधिक तपास केला असता राज्यातील विविध जिल्हे तसेच अन्य राज्यांतून चोरी केलेले ॲपल मोबाइल खरेदी करणारे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचे समोर आले. हे मोबाइल खरेदी केल्यानंतर त्यातील ॲपल आयडी काढून ते अन्य राज्यांत तसेच परदेशात विकले जात होते. ॲपल आयडी काढण्यात अपयश आल्यास मोबाइलचे मिडल बॉडी, डिस्प्ले, बॅटरी, मदरबोर्ड आणि लॉजिक बोर्ड असे विविध भाग वेगळे करून त्यांची बाजारात विक्री केली जात होती. या तपासातून पोलिसांनी टोळीतील चार आरोपींना अटक केली. आरोपींकडून एकूण ६४ चोरीचे ॲपल मोबाइल आणि वेगवेगळे केलेले २० मोबाइल पार्ट्स असा ४४ लाख ७८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या कारवाईमुळे तेलंगणा येथील ११, दिल्लीतील तीन, महाराष्ट्र व मुंबईतील १९, कर्नाटकातील दोन, राजस्थान, तमिळनाडू आणि उत्तराखंड येथील प्रत्येकी एका चोरीच्या गुन्ह्याची उकल झाली आहे. ही कारवाई अपर पोलीस आयुक्त शैलेश बलकवडे, दक्षिण प्रादेशिक विभाग, पोलीस उपायुक्त मनीष कलवानिया, दक्षिण परिमंडळ-१ आणि सहायक पोलीस आयुक्त निलेश बागुल, आझाद मैदान विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल मुळे आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) फरिद खान, सहायक पोलीस निरीक्षक सुशिलकुमार वंजारी, सहायक पोलीस निरीक्षक जालिंद्र लेंभे, पोलीस उपनिरीक्षक राजू साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक अमोल चौरे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने ही कारवाई केली.

# संजय दत्तला माफी; रिक्षावाल्यांना दमदाटी?

## सरनाईकांच्या मराठी सक्तीवरून नरेंद्र मेहता संतापले

प्रतिनिधी ८ सप्टेंबर

**मुंबई:** मराठी भाषेच्या आग्रहावरून सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर भाजपाचे मीरा रोडचे आमदार नरेंद्र मेहता यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यावर टीका केली आहे. अभिनेता संजय दत्तने दहीहंडीच्या कार्यक्रमात मराठी येत नसल्याचे सांगितल्यानंतर सरनाईक हसल्याचा संदर्भ देत, सामान्य रिक्षा-टॅक्सी चालकांबाबत मात्र वेगळी भूमिका का, असा सवाल मेहता यांनी केला. दहीहंडी उत्सवादरम्यान सरनाईक यांनी संजय दत्तला मराठीतून बोलण्याची विनंती केली. त्यावर संजय दत्तने 'तुम्हा सर्वांना नमस्कार' असे मराठीत म्हटले. त्यानंतर प्रतापभाई,



मी सहा वर्षे पुण्याच्या येरवडा तुरुंगात राहिलो, तेव्हाही मराठी शिकू शकलो नाही, असे त्याने सांगितले. यावेळी सरनाईक स्मितहास्य करताना दिसले. याच मुद्द्यावरून मेहता यांनी सरनाईकांना लक्ष्य केले. अभिनेता संजय दत्तला मराठी येत नाही म्हणतो तेव्हा तुम्ही हसता; मात्र सामान्य रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी येत नसेल तर दमदाटी करता. हा कुठला न्याय?' असा सवाल त्यांनी केला. सरनाईक यांच्या 'कथनी आणि करणीमध्ये फरक आहे, अशी टीकाही आमदार मेहता यांनी केली. दरम्यान, प्रवाशांशी मराठीत संवाद साधण्यासाठी रिक्षा-टॅक्सी चालकांमध्ये मराठी भाषेचा प्रसार करण्याची मोहीम सरनाईक यांनी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर मेहता यांच्या टीकेमुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चेला तोंड फुटले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ♦ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ♦ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A 3072, RRC Helpline No. 8484842135